## आतील पानात वाचा


- बहिण भावाच्या नात्याचे पावित्र्य जपणारी राखी पौर्णिमा...
- पालकत्व शिकून घ्या!
- साबे गावातील नाल्यातील टोरेंटच्या केबलमुळे पाण्याचा निचरा बंद, भाजपची कारवाईची मागणी



दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०६ | अंक : १३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२७ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात शासन सकारात्मक - मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**अक्षराज: जे. के. पोळ**

**दि.२६, मुंबई :** राज्य शासन मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात सकारात्मक असून सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांचेकडील मराठा समाजाच्या संबंधी प्रलंबित विषयांवर तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.



मराठा समाजाशी संबंधीत विविध विषयांबाबत आढावा बैठक उपसमितीचे अध्यक्ष विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. या बैठकीस पर्यटन मंत्री शंभुराज देसाई, आमदार प्रसाद लाड, आण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, दूरदृश्य प्रणालीद्वारे न्यायमूर्ती संदिप शिंदे (निवृत्त), उपसमितीचे सचिव आप्पासो धुळाज, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धिरजकुमार, कृषि विभागाचे सचिव परिमल सिंह, नियोजन विभागाच्या सहसचिव गितांजली बाविस्कर, सारथीचे व्यवस्थापकीय संचालक सतिशकुमार खडके, आण्णासाहेब पाटील महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश रणखांब यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे-पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक सोयीसुविधा व सवलती मराठा समाजातील विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याचा निर्णय घेतला असून सर्व विभागांनी याबाबत कार्यवाही सुरु केलेली आहे. यापुढे संबंधित विभागांनी ही प्रक्रिया अधिक गतिमान करुन तातडीने क्षेत्रिय कार्यालयांना उचित निर्देश द्यावेत.

याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मराठा आरक्षण कक्षास सादर करावा. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेतील प्रलंबित निधी तातडीने देण्यात यावा. मराठा समाजाशी संबंधीत विषयांचा मराठा आरक्षण कक्षाशी समन्वय ठेवण्यासाठी सर्व विभागांनी नोडल अधिकारी नियुक्त करावा, अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिल्या.

कुणबी जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र वितरणाच्या कामकाजाचा आढावा घेत प्रमाणपत्रे विहीत मुदतीत देण्यात यावीत असे निर्देश देत विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी या कामकाजाचा आढावा घ्यावा असे मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत सांगितले.

जातपडताळणी समिती अध्यक्षांच्या रिक्त पदांवर संबंधीत विभागांनी तातडीने अधिकारी नियुक्त करावेत. मराठा आरक्षण आंदोलनात बलिदान दिलेल्या व्यक्तींच्या वारसांना शासन सेवेमध्ये नियुक्ती देणेबाबत तातडीने कार्यवाही करावी.

मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, आण्णासाहेब पाटील महामंडळाला शासनाने जुलै अखेरपर्यंत ४५० कोटी रुपये वितरीत केले असून हा निधी तातडीने लाभार्थ्यांना वितरीत करावा. उर्वरित रक्कमेसाठी आवश्यक निधी मागणी सादर करावी. सारथी संस्थेने मराठा समाजातील तरुण-तरुणी यांना रोजगारक्षम बनविणारे प्रशिक्षण उपक्रम राबवावेत.

महावितरण भरती प्रक्रियेतील प्रतिक्षायादीतील उमेदवार यांना नियुक्ती देण्याच्या मागणीवर तपासून कार्यवाही करावी. अधिसंख्य पदावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांचे शासन सेवेत कायमस्वरुपी समावेशन करण्याच्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करावी. तसेच वसतीगृहांचे बांधकाम अंतिम टप्यात असून ४००० मुले व ४००० मुली इतकी क्षमता असलेल्या वसतीगृहांचे व्यवस्थापन करण्यासाठी सक्षम संस्थांची निवड करण्यात यावी, अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिल्या.

## खुणाचा प्रयत्न व मोका अंतर्गत गंभीर गुन्ह्यातील आरोपीला तीन महिन्यात सोलापुरातून अटक !

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**




**दि.२६, पुणे :** पुणे शहर पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे मा.वरिष्ठ्यांच्या आदेशाने घरफोडी करणारे, वाहनचोरी, मोबाईल चोरी, जबरी चोरी करणारे, दरोडा मोका, दरोड्याची तयारी इ. गुन्ह्यातील चेक आरोपी करत असताना कोथरूड पोलीस स्टेशन मधील गुन्ह्यातील रेकॉर्डवर असणारा आरोपी पिंटुसिंग रणबीरसिंग दुधाणी वय ४२वर्षे रा.आंबेडकर नगर, मार्केटयार्ड पुणे यावर गु.र.नं. १३१/२०२३, भा.न्या.सं.क. १०९,११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), १८९(२), १९१(२), १९०, आर्म ऍक्ट ४(२५), म.पो.अधि. क. ३७(१)(३)सह १३५महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम सन १९९९चे कलम ३(१)(ँ), ३(४) हा सोलापूर येथे असलेबाबत पोलीस अंमलदार ८४४२ महेश पाटील यांना गोपनीय बातमीदारा कडून खात्रीशीर माहिती मिळाली.

प्राप्त बातमीची खात्रीशीर माहिती मिळताच दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक ०१चे पोलीस उपनिरीक्षक फडतरे पोलीस अंमलदार बाळू गायकवाड, महेश पाटील,अमित गद्रे,साई कारकेयांच्या पथकाने सोलापूर तालुका पोलीस स्टेशन येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या मदतीने आरोपीच्या तळे, हिप्परगी, जि. सोलापूर येथे राहत्या घराजवळ सापळा रचून दि. २५/०८/२०२६रोजी सकाळी ८:००वाजता ताब्यात घेतले असता आरोपीचे नाव व पत्ता याची खात्री झाली. आरोपीकडे नमूद गुन्ह्यांची चौकशी केली असता त्याने गुन्ह्यांची कबुली दिली. पुढील कायदेशीर कारवाई करीता आरोपीस मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, कोथरूड विभाग यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

मार्गदर्शन : अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) तेजस्वी सातपुते, पोलीस आयुक्त (गुन्हे) गौहर हसन, सहा.पोलीस आयुक्त गुन्हे ३ शंकर खटके

**तपास व अंमलबजावणी पथक :** दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक -१पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, पोलीस उपनिरीक्षक जालिंदर फडतरे, पोलीस अंमलदार बाळू गायकवाड, महेश पाटील, साई कारके, अमित गद्रे, प्रदीप राठोड, रविंद्र लोखंडे, अजित शिंदे, साधना पवार, विद्या पऱ्हाड व नारायण बनकर यांनी केली आहे.

## जबरी चोरीतील दोन पाहिजे आरोपी युनिट-४च्या जाळ्यात

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**



**दि.२६, पुणे :** जबरी चोरी करून दुखापत केल्याप्रकरणी पाहिजे असलेल्या दोन आरोपींना गुन्हे शाखेच्या युनिट-४च्या पथकाने बोपोडी-औंध रोडवरील आंबेडकर चौक परिसरातून ताब्यात घेतले. राजू तिमय्या राव ऊर्फ धोत्रे (वय ५१, रा. आदर्शनगर, बोपोडी) आणि गणेश अशोक रेड्डी (वय ३६, रा. आदर्शनगर, बोपोडी) अशी आरोपींची नावे आहेत. युनिट-४चे पथक २५ ऑगस्ट रोजी खडकी पोलिस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पो. अं. अनिकेत भोसले आणि पो.ह.जहांगिर पठाण यांना आरोपी औंध परिसरातील भक्ती प्लाझाजवळ थांबले असल्याची माहिती मिळाली.माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक कांचन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तत्काळ कारवाई केली. पोलिसांनी भक्ती प्लाझाजवळ सापळा रचून दोन्ही आरोपींना अचानक घेराव घालत ताब्यात घेतले. त्यानंतर दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी लोहगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक कांचन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक वैभव मगदुम, पोलिस उपनिरीक्षक दिग्विजय चौगले, सहायक पोलिस फौजदार हरीश मोरे, एकनाथ जोशी, पोलिस हवालदार अनिकेत भोसले, जहांगिर पठाण, अमजद शेख, तुषार खराडे, दत्तात्रय गेंगजे, विठ्ठल वाव्हळ, किशोर दुशिंग, नितीन साबळे, सुभाष आव्हाड, वैभव रणपिसे, शरद झांजरे, महिला पोलिस अंमलदार रोहिणी पांढरकर आणि मयुरी नलावडे यांच्या पथकाने केली.

## व्हेंटिलेटरचा भीषण स्फोट;३६ नवजात शिशूंना मृत्यूच्या दाढेतून खेचले

- डफरीन रुग्णालयातील परिचारिका व वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे अतुलनीय धाडस
- स्वत:च्या जीवाची पर्वा न करता चिमुकल्यांना दिले जीवनदान!

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२६, अमरावती :** सोमवारी पहाटे साडेतीन वाजण्याची वेळ... संपूर्ण अमरावती शहर गाढ झोपेत असताना जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागात मात्र काही जीवांसाठी काळाशी झुंज सुरू होती. नेहमीप्रमाणे परिचारिका ललिता कासदेकर नवजात बालकांची अत्यंत काळजीपूर्वक शुश्रूषा करत होत्या. वातावरण शांत होते. मात्र अचानक घडलेल्या एका भयंकर घटनेने क्षणार्धात संपूर्ण कक्ष हादरून गेला.

अचानक एका व्हेंटिलेटरचा भीषण स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता इतकी होती की, छतावरील आपत्कालीन वॉटर सिस्टीम जळून खाक झाली. व्हेंटिलेटरचे तुकडे दूरवर उडाले आणि काही क्षणांतच नवजात शिशूंच्या कक्षात धुराचे प्रचंड लोळ पसरले. वीज गेल्याने परिसरात काळोख निर्माण झाला आणि समोर मृत्यूचे भयावह सावट उभे राहिले.या संकटाच्या क्षणी मात्र दोन परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी दाखवलेले धैर्य खरोखरच



अभूतपूर्व ठरले.स्वतःचा जीव वाचवण्यापेक्षा काचेच्या पेट्यांमध्ये जीवनासाठी झुंज देणाऱ्या निष्पाप चिमुकल्यांना वाचवणे महत्त्वाचे,या एकाच ध्येयाने त्यांनी आगीच्या आणि धुराच्या लोटांमध्ये धाव घेतली.

आगीत हात भाजले, धुरामुळे श्वास घेणे कठीण झाले, तरीही त्यांनी माघार घेतली नाही. एकापाठोपाठ एक नवजात बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याची मोहीम सुरू झाली. काही क्षणांचा विलंबही एखाद्या निष्पाप जीवासाठी घातक ठरू शकतो,याची जाणीव असलेल्या या देवदूतांनी अक्षरशः मृत्यूशी दोन हात करत ३६ नवजात शिशूंचे प्राण वाचवले.

या परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी दाखवलेले धैर्य केवळ कर्तव्यपूर्ती नव्हे, तर मानवतेचा सर्वोच्च आदर्श आहे. संकटाच्या क्षणी स्वतःच्या सुरक्षिततेचा विचार न करता इतरांचे प्राण वाचवणाऱ्या या 'डफरीनच्या देवदूतां'चे साहस अमरावतीच्या इतिहासात निश्चितच सुवर्ण अक्षरांनी लिहिले जाईल.३६ चिमुकल्यांना नवजीवन देणाऱ्या या धाडसी परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांना मानाचा मुजरा.

## दहीहंडी हा खेळ कॉमनवेल्थ आणि ऑलिम्पिक मध्ये नेण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार - मुख्यमंत्री

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२६, मुंबई :** गोविंदा हा महाराष्ट्राच्या संस्कृतीची आणि मुंबईची ओळख आहे. 'प्रो गोविंदा'च्या माध्यमातून हा खेळ संपूर्ण भारतासह जगात पोहोचला आहे. गोविंदाच्या या साहसी खेळाला अखिल भारतीय स्तरावर मान्यता मिळवून देत एशियाड, कॉमनवेल्थ आणि पुढे ऑलिम्पिक पर्यंत नेण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

प्रो गोविंदा लीग २०२६ सिझन ४ चा उद्घाटन सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत एसव्हीपी स्टेडियम, वरळी येथे पार पडला त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, मुंबई महानगरपालिकेच्या महापौर रितू तावडे, आमदार रणजीत पाटील, लीगचे अध्यक्ष पूर्वेश सरनाईक, शायना एन. सी उपस्थित होते.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्याच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या दहीहंडी उत्सवाला आधुनिक आणि व्यावसायिक क्रीडा स्पर्धेचे स्वरूप देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली प्रो गोविंदा लीग (पीजीएल) देशातील मानवी मनोरे रचण्याच्या खेळासाठीची पहिली व्यावसायिक लीग म्हणून ओळखली जाते.

दहीहंडी हा केवळ उत्सव नसून समाजाला एकत्र आणणारा आणि सामाजिक अभिसरणाचा संदेश देणारा उपक्रम आहे.

गोविंदांनी एकमेकांना आधार देत मानवी साखळी तयार करून हंडी फोडण्याची परंपरा जपली आहे. भगवान श्रीकृष्णांनी दिलेला 'संपूर्ण समाज एक आहे' हा संदेश या खेळातून अधोरेखित होतो. एकीच्या बळावर कोणत्याही संकटाचा सामना करता येतो आणि मोठे कार्य साध्य करता येते.

या खेळाला अखिल भारतीय स्तरावर ऑलिम्पिक असोसिएशन तसेच संबंधित क्रीडा संघटनांची मान्यता मिळवून देणे त्यानंतर हा खेळ एशियाड, कॉमनवेल्थ आणि अखेरीस ऑलिम्पिकपर्यं३२७३त नेण्याच्या दृष्टीने शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल अशी ग्वाही मुख्यमंत्री यांनी दिली. यावेळी मुख्यमंत्री यांनी सर्व गोविंदा पथके, त्यांचे प्रशिक्षक तसेच गोविंदांना प्रोत्साहन देत शुभेच्छा दिल्या.

**मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की,** दही - हंडी (प्रो गोविंदा) खेळाला राज्य शासनाने साहसी खेळाचा दर्जा दिला आहे. तसेच शासन २०२३ पासून गोविंदांना विमा देत आहे.

यावर्षी गोविंदांची संख्या वाढवून एक लाख ६० हजार गोविंदा ना विमा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावेळी १६ संघ आणि ३२०० गोविंदांनी सहभाग घेतला असून, तीन दिवस या स्पर्धा सुरू रहाणार आहेत.




## अजरामर पार्श्वगायक मुकेश!

आज २७ ऑगस्ट, हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मुकेश यांचा स्मृतिदिन. आपल्या दर्दभऱ्या, भावस्पर्शी आणि मनाला भिडणाऱ्या आवाजाने तीन दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे मुकेश आजही आपल्या स्वरांच्या माध्यमातून रसिकांच्या हृदयात जिवंत आहेत. त्यांच्या निधनाला अनेक दशके उलटली, तरी त्यांच्या आवाजाची जादू आजही कायम आहे. २२ जुलै १९२३ रोजी दिल्ली येथे मुकेश यांचा जन्म झाला. त्यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथुर असे होते. त्यांचे बालपण दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौक परिसरात गेले. त्यांचे वडील जोरावर चंद माथुर हे अभियंता होते, तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना लहानपणापासूनच संगीताची विशेष आवड होती. त्या काळातील महान गायक कुंदनलाल सहगल यांचे ते निस्सीम चाहते होते. सहगल यांच्याप्रमाणेच अभिनेता आणि गायक होण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले. मुकेश यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी घटना त्यांच्या एका नातेवाइकाच्या लग्नात घडली. त्या वेळी प्रसिद्ध अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना गाताना ऐकले. त्यांच्या आवाजाने मोतीलाल इतके प्रभावित झाले की, या तरुणाचा आवाज भविष्यात हिंदी चित्रपटसृष्टीत मोठी ओळख निर्माण करेल, असा त्यांना विश्वास वाटला. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यासाठी पंडित जगन्नाथ प्रसाद यांच्याकडे पाठवले. मुकेश यांना अभिनयाचीही आवड होती. त्यांच्या देखण्या व्यक्तिमत्त्वामुळे त्यांना काही चित्रपटांमध्ये अभिनयाच्या संधी मिळाल्या. १९४१ मध्ये 'निर्दोष' या चित्रपटातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतरही त्यांनी काही चित्रपटांमध्ये भूमिका केल्या; मात्र अभिनय क्षेत्रात त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे नायक होण्याचे स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी आपले संपूर्ण लक्ष गायनाकडे केंद्रित केले. १९४५ मध्ये 'पहली नजर' या चित्रपटातून मुकेश यांना पार्श्वगायक म्हणून मोठी संधी मिळाली. या चित्रपटातील 'दिल जलता है तो जलने दो' हे गीत अत्यंत लोकप्रिय झाले. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या गायनशैलीचा प्रभाव जाणवत होता. मात्र मुकेश यांनी पुढे स्वतःची स्वतंत्र शैली विकसित केली. १९५८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'यहूदी' चित्रपटातील 'ये मेरा दीवानापन है' या गीताने मुकेश यांच्या गायकीला नवी दिशा दिली. या गीतातून त्यांचा स्वतंत्र, भावपूर्ण आणि दर्दभरा आवाज रसिकांसमोर ठळकपणे आला. त्यानंतर त्यांच्या कारकिर्दीने वेग घेतला. 'मेला', 'अंदाज' यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या गीतांनी त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेले. मुकेश आणि राज कपूर यांचे नाते हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एक अजरामर पर्व आहे. राज कपूर यांच्या पडद्यावरील व्यक्तिमत्त्वाला मुकेश यांच्या आवाजाने एक वेगळी भावनिक ओळख मिळवून दिली. 'आग', 'बरसात', 'आवारा', 'श्री ४२०', 'परवरिश', 'अनाडी', 'संगम', 'मेरा नाम जोकर' अशा अनेक चित्रपटांतील गाणी लोकप्रिय झाली. त्यामुळे 'राज कपूर यांचा आवाज' अशी मुकेश यांची ओळख निर्माण झाली. मुकेश यांच्या आवाजाची खासियत म्हणजे त्यातील नैसर्गिक भावुकता. त्यांच्या आवाजात कृत्रिमता नव्हती. प्रेम, विरह, दुःख, एकाकीपणा, आशा आणि जीवनातील संघर्ष या भावना ते अत्यंत सहजतेने व्यक्त करीत. त्यामुळे त्यांचे गीत ऐकताना ते केवळ गाणे ऐकत असल्याची भावना होत नसे, तर एखादी हृदयस्पर्शी कथा आपल्या मनासमोर उलगडत असल्याचा अनुभव येत असे. मुकेश यांनी हिंदी चित्रपटसंगीताला असंख्य अविस्मरणीय गीते दिली. 'दोस्त दोस्त ना रहा', 'जीना यहाँ मरना यहाँ', 'कहीं दूर जब दिन ढल जाए', 'मैं पल दो पल का शायर हूँ' यांसारख्या त्यांच्या गीतांनी अनेक पिढ्यांच्या मनावर राज्य केले. त्यांच्या स्वरांमध्ये जीवनातील वेदना व्यक्त करण्याची विलक्षण ताकद होती. म्हणूनच त्यांना 'दर्दभरा आवाज' अशी ओळख मिळाली. १९७६ मध्ये राज कपूर यांच्या 'सत्यम शिवम सुंदरम' या चित्रपटासाठी गाण्याचे ध्वनिमुद्रण करून मुकेश अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. २७ ऑगस्ट १९७६ रोजी अमेरिकेतील डेट्रॉईट येथे त्यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच राज कपूर यांनी, आज माझा आवाज कायमचा हरपला, अशी हृदयस्पर्शी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांच्या निधनाने हिंदी चित्रपटसृष्टीने एक महान पार्श्वगायक गमावला. मुकेश यांना त्यांच्या कारकिर्दीत अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. 'रजनीगंधा' चित्रपटातील 'कई बार यूँ ही देखा है' या गीतासाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. तसेच त्यांना चार वेळा फिल्मफेअर पुरस्काराने गौरविण्यात आले. मात्र पुरस्कारांपेक्षाही आपल्या चाहत्यांच्या हृदयात मिळालेले स्थान हेच त्यांच्या कलेचे खरे यश होते. मुकेश यांचा आवाज हा केवळ एक स्वर नव्हता; तो भावनांचा स्पर्श होता. त्यांच्या गाण्यांमधून व्यक्त होणारा दर्द, प्रेम आणि जीवनाचे तत्त्वज्ञान आजही रसिकांना अंतर्मुख करते. काळ बदलला, संगीताच्या शैली बदलल्या, तंत्रज्ञान बदलले; परंतु मुकेश यांच्या स्वरांची मोहिनी मात्र आजही कायम आहे. काही गायक काळाच्या ओघात विस्मृतीत जातात; पण काही स्वर काळावर मात करून अजरामर होतात. मुकेश हे अशाच अजरामर स्वरांचे गायक होते. त्यांच्या आवाजात भारतीय मनातील सुख-दुःख, प्रेम-विरह आणि जीवनातील असंख्य भावनांचे प्रतिबिंब उमटले होते. म्हणूनच मुकेश आज आपल्यात नसले तरी त्यांचा आवाज प्रत्येक पिढीला पुन्हा पुन्हा आपलासा वाटतो. अजरामर स्वरांना मृत्यू नसतो; ते गीतांच्या रूपाने सदैव जिवंत राहतात. स्मृतिदिनी या महान, अजरामर पार्श्वगायक मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!

**- श्याम ठाणेदार**

# बहिण भावाच्या नात्याचे पावित्र्य जपणारी राखी पौर्णिमा

दरवर्षी श्रावण पौर्णिमेला महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात राखी पौर्णिमा हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. राखी पौर्णिमा अर्थात रक्षाबंधन सण बहिण भावाचे पवित्र नाते जपणारा एक विलक्षण असा आनंददायी सण आहे. या जगात वेगवेगळे नाते संबंध जिवापाड जपले जातात. परंतु बहिण भावाच्या नात्याचे वेगळेपण हेच आहे की या नात्यात नटखटपणा, आपुलकीचा जिव्हाळा आणि ठसठशीत आपलेपणा दडला आहे. लहानसहान कारणांमळे भांडण करणारे बहिण भाऊ क्षणात एकमकांवर जीव ओवाळून टाकायला तयार होतात. वर्षभर एकमेकांपासून दूर असणारे बहिण भाऊ राखी पौर्णिमा सणाला आवर्जून एकत्र येतात आणि हा पवित्र सण साजरा करतात. या सणाच्या दिवशी घराघरांत आनंदाचे, उत्साहाचे, चैतन्याचे व मंगलमयतेचे वातावरण असते. राखी पौर्णिमेला भाऊ बहिणींच्या घरी जातात किंवा बहिणी भावांच्या घरी जातात आणि हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. यावर्षी २७ ऑगस्टला शुक्रवारी राखी पौर्णिमा हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे.

बहिण भावाच्या नात्याचे वर्णन अनेक कवींनी, गीतकारांनी, लेखकांनी अतिशय सुरेख व भावनिक शब्दांत केले आहे. राखी पौर्णिमेला सोशल मीडियावर बहिण भावाच्या पवित्र नात्याचे सुरेख संदेश, भावांना राखी बांधतानाचे फोटो व बहिण भावाला ओवाळतानाचे व्हिडिओ पाहायला मिळतात. राखी पौर्णिमा पंधरा दिवसांवर आली की सर्वांना या सणाचे वेध लागतात.घरातील सगळे जण या सणाची आतुरतेने वाट पाहत असतात. भावांसाठी राखी खरेदी करण्यासाठी बहिणींची लगबग सुरू होते आणि बहिणींसाठी गिफ्ट खरेदी करण्यासाठी भावांची धावापळ चाललेली असते. आणि प्रत्यक्ष राखी पौर्णिमेच्या दिवशी बहीण भाऊ व इतर नातलग एकत्र जमतात आणि राखी पौर्णिमा सण उत्साहात साजरा करतात. बहिणी भावांना राखी बांधतात, आरतीने ओवाळून भावांचे औक्षण करतात. नंतर गोड पेढा भरवला जातो. मग भाऊ बहिणींना ओवाळणीची भेट म्हणून छानसे गिफ्ट देतात, पैशाच्या रूपात भेट देतात आणि संकटकाळात बहिणीच्या मदतीला धावून जाण्याचे व बहिणीचे रक्षण करण्याचे बांधवांकडून बहिणींना मनोमन अभिवचन दिले जाते.राखी बांधून झाल्यावर घरातील सगळेजण एकत्र बसून मेजवानीचा आनंद लुटतात.

आमच्या लहानपणी रंगीबेरंगी अशा दोऱ्याच्या राख्या बांधल्या जायच्या. मधल्या काळात स्पंजच्या मोठ्या आकाराच्या राख्या बांधल्या जायच्या. आणि आताच्या काळात आकाराने लहान, नाजूक व मनमोहक अशा



राख्या बांधल्या जात आहेत. काळानुरूप इतर सणांचे महत्त्व व आकर्षण कमी कमी होत आहे परंतु राखी पौर्णिमा सणाचे महत्त्व थोडे सुध्दा कमी झालेले नाही. पण काही नोकरदार व श्रीमंत भाऊ आपल्या गरीब बहिणींकडे बघायला तयार नाहीत. तिच्या लेकरांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जात आहे. बहिण जेव्हा आर्थिक संकटात असते तेव्हा तिला मदत करायचे सोडून तिला आपलेच गाऱ्हाणे सांगितले जाते. राखी पौर्णिमा सणाच्या निमित्ताने सगळ्या भावांना विनंती की आपल्या बहिणींना कधीही अंतर देऊ नका. इतर नात्यांप्रमाणे बहिण भावाच्या नात्याचे पावित्र्य व महत्त्व ओळखून त्याला मनोमन जीवापाड जपा. जिनकी होती है बहना वो भाई किस्मतवाले है, भैय्या मेरे राखी के बंधन को निभाना, फुलों का तारों का सबका कहना है एक हजारों में मेरी बहना है, बहनों ने भाई के कलाई पर प्यार बांधा है या गितांमध्ये राखी पौर्णिमा सणाचे महत्त्व अतिशय भावनिक व सुंदर शब्दांत वर्णन केले गेले आहे. राखी पौर्णिमा सणाचे महत्त्व ओळखून सर्व बहिण भावांनी या सणाची गोडी व महत्त्व जपलेच पाहिजे. परंतु,ज्या महामानवांनी भारतात सामाजिक सुधारणा करून स्त्री शिक्षणाचे महत्त्व देशाला ठणकावून सांगितले, भारतातील मनुवादी व्यवस्था संपुष्टात आणली व स्त्री पुरुष समानता रुजवली त्या सर्व महामानवांची आठवण ठेवा. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, ईश्वरचंद्र विद्यासागर या व इतर महामानवांची आवर्जून आठवण ठेवून राखी पौर्णिमा हा सण साजरा करावा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवशाही राज्यकाळात सर्व स्त्रिया सन्मानाने जीवन जगत होत्या. महिलांचा मानसन्मान जीवापाड जपला जायचा. साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या प्रत्येक पुस्तकात स्त्रियांचा बाणेदारपणा, कणखरपणा व कर्तृत्व रेखाटले आहे.स्त्रियांचा मान सन्मान जपणे हे सर्वांचे आद्यकर्तव्य असले पाहिजे हे लेखनातून स्पष्ट केले आहे. म्हणून समस्त स्त्रियांनी हे लक्षात घ्यावे की हे सगळे महामानव तुमचे भाऊ होते व सावित्रीबाई फुले आपल्या सर्वांच्या बहिण होत्या. राखी पौर्णिमा या पवित्र सणाच्या निमित्ताने समस्त बहिणींना व सर्व भावांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२.**

# पालकत्व शिकून घ्या!

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तिसगाव येथील खवड्या डोंगरावर आत्महत्या करण्यासाठी गेलेल्या १९ वर्षीय मुलाला वाचवण्याचा प्रयत्न करत असताना आई-वडिलांचाही दरीत पडून मृत्यू झाल्याची घटना मागील आठवड्यात घडली. ही बातमी वाचल्यानंतर मन सुन्न झाले. मनात एक प्रश्न उमटलापालकत्व शिकवण्यासाठी शिकवणी वर्ग सुरू करावे लागतील का?

सुजाण पालकत्वासंबंधी पुस्तके ढिगाने प्रकाशित झाली आहेत. त्याचबरोबर आज विविध माध्यमांतून पालकत्वाचे धडे देणाऱ्या तज्ज्ञांचे व्हिडिओही मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत. या घटनेनंतर शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनी आपल्या फेसबुक वॉलवर हाच मुद्दा नेमक्या शब्दांत मांडला आहे. त्यांच्या मते

पालकांना कोणतेही पालकत्वाचे प्रशिक्षण नाही. आपल्या देशात पालक होण्यासाठी कोणतीही पदवी लागत नाही. साधी गाडी चालवण्यासाठी लायसन्स लागते; पण पालक होण्यासाठी कोणतीही अट नाही. पालकत्व हे काही शहरी फॅड नाही; ते अगदी गरीब कुटुंबालाही लागू आहे.

आज पालकांसमोर पालक म्हणून अनेक प्रश्न उपस्थित करता येतील. पाल्यांचे पालनपोषण करणे हे नैसर्गिक राहिले आहे का? पाल्याला अपयश आले तर आपण त्याला कितपत समजून घेतो? स्पर्धा वाढली आहे, त्याचबरोबर पालकांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. पालकांना पाल्याच्या जागी जाऊन विचार करता आला पाहिजे. आपण दहावी, बारावी अथवा पदवी घेत असताना कोणकोणत्या संकटांवर मात केली? किती गोष्टी वाऱ्यावर सोडून दिल्या? आपण कितपत कष्ट घेतले? आणि आता आपण मुलांकडून कितपत कष्टाची अपेक्षा करत आहोत? लाड पुरवण्याच्या नादात आपण मुलांना कमतरतेची जाणीव करून देत आहोत का? आपल्या स्वतःच्या आर्थिक क्षमतेची जाणीव मुलांना स्पष्टपणे करून देत आहोत का? असे अनेक प्रश्न पालक-पाल्य नात्यासंबंधी निर्माण होत आहेत.

मुलांशी निकोप संवाद साधण्यात आपण जितके यशस्वी होऊ, तितके आपले पालकत्व यशस्वी होणार आहे. काही वेळा संवादाशिवायदेखील आपले वर्तन मुलांना आश्वासक वाटू शकते. पालक म्हणून आपली उपस्थिती, आपला स्पर्श आणि आपले विचार मुलांच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देत असतात.संवाद नेहमी शैक्षणिक वाटचाल, मिळणारे गुण अथवा भविष्यातील नोकऱ्या आणि संधी यांपुरता मर्यादित नसावा. मुलांबरोबर होणाऱ्या संवादात त्यांच्या विश्वात डोकावून पाहण्यापासून ते त्यांच्या आवडीनिवडी, खेळ आणि त्यांच्या भावविश्वाशी मैत्री जोडण्यापर्यंत अनेक गोष्टींचा समावेश असावा. सतत उपदेशाचे डोस पाजू लागल्यास मुले आपल्याला टाळू लागतील. ती आपल्यापासून दूर जातील. त्यांना आवडणाऱ्या विषयांवर आपण बोलू लागलो, तर मात्र मुले आपल्याशी मुक्तपणे संवाद साधू लागतील.

मुलेही आपलेच प्रतिबिंब आहेत, ही गोष्ट आपण ध्यानात घेतली पाहिजे. अनेक जैविक घटक आपण मुलांना दिलेले असतात. त्यांना मिळालेली शारीरिक संपन्नता अथवा काही कमतरता जन्मजात काही प्रमाणात आपल्यामुळे त्यांच्यात आलेली असते. त्यांच्या मनोवृत्ती आणि भावना यांमध्येही आपल्याशी साधर्म्य असू शकते. त्याचबरोबर आपण दिलेले प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संस्कारही मुलांना चांगले किंवा वाईट घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.मुलांना घडवण्यात पालकांचा सिंहाचा वाटा असतो, हे खरे आहे. म्हणून पालक म्हणून आवश्यक असणाऱ्या अनेक लहान-मोठ्या गोष्टी आपण शिकून घेतल्या पाहिजेत. सुजाण पालकत्वावरील पुस्तके वाचली पाहिजेत अथवा तज्ज्ञांचे व्हिडिओ आवर्जून पाहिले पाहिजेत. मुलांच्या वर्तनात होणाऱ्या बदलांकडे बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे. मुलांमध्ये चुकीचे अथवा चिंताजनक वर्तन दिसून आल्यास मानसोपचारतज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले पाहिजे.आपल्याला जे जे जमत नाही, ते शिकण्यात आणि स्वतःमधील कमतरता मान्य करण्यात कोणताही कमीपणा वाटून घेतला नाही पाहिजे.

'मूल म्हणजे मातीचा गोळा आणि आपण पालक अथवा शिक्षक म्हणजे कुंभार; आपण त्याला आकार देण्याचे काम करत आहोत,' असे मानणे आता कालबाह्य झाले आहे. आजची मुले ही मातीचे गोळे राहू शकत नाहीत. त्यांच्या जाणीवा, ज्ञान आणि माहिती वाढवण्याची अनेक साधने उपलब्ध झाली आहेत. अशा काळात आपणदेखील पालक म्हणून पालकत्वासंबंधीचे ज्ञान, माहिती आणि जाणीवा याबाबत शिकून घेण्यास आणि त्यानुसार स्वतःच्या वर्तनात बदल करून घेण्यास काहीच हरकत नाही.

पालकत्व ही जन्मतः मिळणारी भूमिका असली, तरी सुजाण पालकत्व ही शिकण्याची प्रक्रिया आहे. ती आपण सर्वांनी मनापासून शिकून घेतली पाहिजे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## सोनेरी पर्याय

इव्हेंट करतो मॅनेज
आता सोनेरी पर्याय
सगळ्याव्याधीवरती
एक रामबाण उपाय

हवे तेवढे देतो डोके
सांगाकिती हवे पाय
फक्त नोंदवा ऑर्डर्स
कार्यक्रम आहे काय

रॅली पद यात्रा मोर्चा
यंत्रणे करे अ सहाय
खास उपोषण वाला
करतो आम्ही सहाय

गुन्हे घेती अंगा वरती
कुणीही नको सांगायं
लाठीकाठी घेई पाठी
मिळेलं बैल अन् गाय

जलसमाधी आंदोलन
देऊ रडणारे धायधाय
फाशीप्रयत्न करणारा
असेकुणी कुणाहवायं

दर ठरतो कामानुसार
बिदागी स्थिती निहाय
चर्चा करतो हॅलो हाय
कधी निषेध हाय हाय

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# अल्पसंख्य स्त्रियांचा विचार राहुल गांधी केव्हा करणार ?

'छात्रोकी गुंज' या कार्यक्रमात तरुणीशी संवाद साधताना 'महिला कधीच स्वतंत्र होऊ नयेत हा मनुस्मृतीचा डाव आहे' असा थेट आरोप काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केला. सोबतच महिलांना तुम्ही कोणालाही बांधील नसल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.

भारतीय जनता पार्टीने एकामागोमाग अनेक राज्यांत सत्ता स्थापन केल्यानंतर आणि लोकसभेतही तिसरी टर्म जिंकल्यानंतर देशात हिंदूंची व्होटबँक तयार होत आहे कि काय या भीतीने राहुल गांधी यांनी देशभरातील अनेक तीर्थस्थळांना भेटी दिल्या, भगव्या शाली परीधान केल्या. त्यामुळे कधी काळी अल्पसंख्याकांच्या मतपेटीच्या बळावर वर्षोनुवर्षे राज्य करणाऱ्या काँग्रेसची पावले चुकीच्या दिशेने तर जात नाहीत ना असा संभ्रम काँग्रेसच्या जुन्या जाणत्या नेत्यांमध्येही निर्माण झाला होता.

'छात्रोकी गुंज' या युवाशक्तीच्या कार्यक्रमातही राहुल गांधी यांनी मनुस्मृतीचा उल्लेख केल्यामुळे राहुल गांधी आता केवळ हिंदूंचाच विचार करू लागले आहेत असा दृढविश्वास सामान्य जनतेच्या मनातही निर्माण झाला आहे कारण गेल्या काही दशकांत



हिंदूंच्या विचारसरणीत झालेला आमूलाग्र बदल प्रत्येकाने पाहिला आहे. कधीकाळी पारंपारिक वेशभूषेत दिवसभर वावरणारी हिंदू स्त्री काळाला अनुसरून जीन्स आणि स्कर्टमध्येही समाजात मोकळेपणाने फिरू लागली आहे.

याउलट स्वतंत्र भारतातील एका समाजात आज एकविसाव्या शतकातही स्त्रियांना बुरखा परिधान करण्याची सक्ती केली जात आहे, मग ती स्त्री शाळा महविद्यालयांत जाणारी किशोरी असो वा नोकरी व्यवसायासाठी घराबाहेर पडणारी प्रौढ स्त्री असो. 'ट्रिपल तलाक' सारख्या प्रथा आजही या समाजातील स्त्रियांचे मानसिक खच्चीकरण करत आहेत, 'हलाला' सारख्या प्रथा स्त्रीला गुलामगिरीच्या वेदना देणाऱ्या आहेत.

आजही या समाजात स्त्रियांना भगवंताच्या प्रार्थनास्थळात प्रवेश देण्यापासून रोखले जाते. अनेक मुले जन्माला घालण्यास प्रवृत्त केले जाते. वर्षोनुवर्षे चालत आलेल्या या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या स्त्रियांचा आवाज समाजातील पुरुषवर्गाकडून दाबला जातो. धार्मिक प्रथा परंपरांचे लेबल केवळ स्त्रियांनाच का ? हा अत्याचार त्यांनी किती दिवस सहन करायचा ? अल्पसंख्याकांना नेहमीच प्रथम प्राधान्य देणाऱ्या काँग्रेसचे नेते राहुल गांधीं याविषयी काही बोलतील अशी अपेक्षा असताना यावेळीही ते केवळ हिंदू स्त्रियांच्या बाजूनेच बोलले. अल्पसंख्य समाजातील स्त्रियांचे दुःख राहूल गांधी यांना केव्हा दिसणार ?

**- नरेश घरत, चेंबूर**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



## थोडक्यात बातम्या

### डॉ.सारिका भळगट यांना शिवगौरव पुरस्कार - २०२६ प्रदान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, पुणे :** नुकताच पुण्यातील ऐतिहासिक लाल महाल येथे आयोजित भव्य सोहळ्यात श्री शंभूराज्याभिषेक ट्रस्ट, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दंतवैद्यकीय क्षेत्र तसेच डिजिटल मीडिया क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन डॉ.सारिका भळगट यांना यंदाचा शिवगौरव पुरस्कार – २०२६ प्रदान करण्यात आला. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार राजस्थानचे महामहिम राज्यपाल हरिभाऊ (नाना) बागडे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळेस पुणे मनपाचे नगरसेवक सनी निम्हण आणि ज्येष्ठ उद्योजक पुनीत बालन उपस्थित होते.

### कर्जत तालुक्यातील रस्ते खड्डेमुक्त करा; गणेशोत्सवापूर्वी दुरुस्तीची मागणी



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२६, कर्जत (रायगड) :** तालुक्यातील विविध रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, ठिकठिकाणी पडलेले खड्डे तातडीने बुजवून रस्ते खड्डेमुक्त करावेत, अशी मागणी पोलिस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया, नवी दिल्ली या संघटनेच्या वतीने करण्यात आली. याबाबत कर्जत उपविभागीय कार्यालयात निवेदन देण्यात आले. कर्जत तालुक्यातील कशेळे, कडाव, चांधई, कोंदिवडे, गुडवण, भालिवडी, हालिवलीवाडी, पाली, गौळवाडी, वैजनाथ, मिरचोली आदी भागातील रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. तसेच रस्त्यांवरील स्पीड ब्रेकरही खड्डेमय झाल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.यावर्षी तालुक्यातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले असून, या खड्ड्यांमुळे अनेक अपघात घडल्याचा दावा संघटनेने केला आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची मोठी वर्दळ वाढणार असल्याने, उत्सवापूर्वी रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून खड्डे बुजवावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. गणेशोत्सवापूर्वी रस्ते खड्डेमुक्त न झाल्यास संघटनेच्या वतीने उपोषणाचे हत्यार उपसावे लागेल, असा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला.दरम्यान, संघटनेच्या मागणीवर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी राहुल शरद देवांग यांनी सकारात्मक आश्वासन दिले. गणेशोत्सवापूर्वी तालुक्यातील महत्त्वाच्या ठिकाणचे खड्डे भरण्यात येतील, तसेच याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर साळोखे, रायगड जिल्हा युवक अध्यक्ष प्रफुल्ल जाधव, हभप वासुदेव महाराज बडेकर (समाज प्रबोधन), जिल्हा सदस्य संतोष पवार यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

### पोलीस व्यापारी संकुलाचे उद्घाटन संपन्न



**अक्षराज : जफर शेख**

**दि.२६, बोरी (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथे पोलीस पेट्रोल पंपाशेजारी परभणी जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने उभारण्यात आलेल्या पोलीस व्यापारी संकुलाचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्यास अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, जिंतूर उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल विभुते, पोलीस उपअधीक्षक (गृह) बुद्धिराज सुकाळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक तथा पोलीस कल्याण शाखेचे बालाजी तोटेवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पोलीस व्यापारी संकुलाचे विधिवत उद्घाटन करण्यात आले. बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पावधीत या संकुलाची उभारणी केली. संकुलाच्या उभारणीसाठी वापरण्यात आलेले साहित्य दर्जेदार असून, संकुलामध्ये एकूण २५ व्यापारी गाळे उभारण्यात आले आहेत. या व्यापारी संकुलामुळे परिसरातील २५ कुटुंबांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. या गाळ्यांच्या माध्यमातून संबंधित कुटुंबांना व्यवसाय करता येणार असून, त्यांच्या उदरनिर्वाहाला आर्थिक आधार मिळणार आहे. पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीसाठी करण्यात आलेल्या या उपक्रमाचे बोरी परिसरातील नागरिकांनी स्वागत केले. उद्घाटनानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

त्यांनी व्यापारी संकुलाची पाहणी करून संकुलाबाबत माहिती जाणून घेतली. अल्पावधीत संकुल उभारण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल त्यांनी बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांचे कौतुक केले. या उपक्रमामुळे बोरी परिसरात व्यवसायासाठी नवीन संधी निर्माण झाली असून, स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. पोलीस प्रशासनाच्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्येही समाधान व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमास बोरी व परिसरातील नागरिक, पोलीस पाटील, पोलीस कर्मचारी, होमगार्ड, पत्रकार बांधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महादेव गायकवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक थोरवे, शेख वसीम, राजेश जटाळ, राठोड प्रताप, साळवणे प्रकाश मोरे, संघसेन कांबळे, कोकाटे, महिला पोलीस कर्मचारी फरहीन रंगरेज यांच्यासह पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांनी परिश्रम घेतले.

### जश्ने-ईद-ए-मिलादुन्नबी च्या शोभायात्रेचे आ.जोरगेवार यांनी मिठाई वाटप करत केले स्वागत



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** दरवर्षीप्रमाणे यंदाही मुस्लिम समाजबांधवांच्या वतीने जश्ने-ईद-ए-मिलादुन्नबी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ही शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत छोटा बाजार चौकात पोहोचली. येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने आ. किशोर जोरगेवार यांनी शोभायात्रेचे स्वागत केले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष राशिद हुसेन, राजिक खान, इमरान खान, एजाज शेख, सोहेल शेख, जफर बेग, सय्यद अबरार, मोहम्मद साकिब, विजय राउत, तुषार सोम, राकेश बोमनवार, चंद्रशेखर देशमुख, तापोष डे, रामकुमार अक्कापल्लीवार आदींची उपस्थिती होती. शोभायात्रा छोटा बाजार चौकात पोहोचताच आ. किशोर जोरगेवार यांनी मंचावरून शोभायात्रेचे उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी शोभायात्रेत सहभागी झालेल्या मौलाना तसेच मुस्लिम समाजातील मान्यवरांचा आ. जोरगेवार यांच्या हस्ते शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

उपस्थित मुस्लिम बांधवांशी संवाद साधत त्यांनी जश्ने-ईद-ए-मिलादुन्नबीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना आ. किशोर जोरगेवार यांनी ईद-ए-मिलादुन्नबी हा प्रेम, शांतता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारा पवित्र दिवस असल्याचे सांगितले. चंद्रपूर शहराची ओळख सर्वधर्मीयांची एकता, सामाजिक सलोखा आणि परस्पर सन्मानाची आहे असे ते म्हणाले.

## साबे गावातील नाल्यातील टोरेंटच्या केबलमुळे पाण्याचा निचरा बंद, भाजपची कारवाईची मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२६, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील साबे गावातील विठ्ठल मंदिराशेजारील मुख्य नाल्यातून टोरेंट पॉवर कंपनीने केबल टाकल्याने नाल्यातील सांडपाण्याचा नैसर्गिक प्रवाह रोखला गेल्याचा प्रकार समोर आला आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत भाजप दिवा शील मंडळाचे अध्यक्ष सचिन रमेश भोईर यांनी टोरेंट पॉवर कंपनीच्या दिवा पूर्व कार्यालयाला निवेदन दिले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, सदर केबल नाल्याच्या मधोमध टाकल्याने नाल्यातील गटाराच्या पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नसून पाणी अडून राहत आहे. त्यामुळे नाला वारंवार चोकअप होऊन परिसरात सांडपाणी साचत आहे. साचलेल्या सांडपाण्यामुळे परिसरातील



नागरिकांना दुर्गंधी, अस्वच्छता आणि डासांचा प्रादुर्भाव या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात ही परिस्थिती आणखी गंभीर झाली असून नागरिकांच्या आरोग्याला आणि परिसराच्या स्वच्छतेला धोका निर्माण झाला आहे.

टोरेंट पॉवर कंपनीने सदर ठिकाणी तातडीने पाहणी करून, नाल्यातील पाण्याचा प्रवाह सुरळीत होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. केबलमुळे अडथळा निर्माण होत असल्यास ती योग्य पद्धतीने स्थलांतरित/व्यवस्थित करून नाल्याचा पूर्ण क्षमतेने निचरा होईल याची व्यवस्था करावी, अशी मागणी भोईर यांनी केली आहे.

सदर समस्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी व आरोग्याशी संबंधित असल्याने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी, अशी विनंतीही या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर टोरेंट पॉवर कंपनीने Inward No. ५९४६५, दि. २५/०८/२०२६ रोजी सकाळी ११.२० वाजता स्वीकृती दिली आहे.

## दिव्यात ‘एकल महिला योजना’ नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

### नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांची प्रभाग समितीला भेट

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२६, दिवा, (ठाणे) :** ठाणे महानगरपालिकेच्या महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या ‘एकल महिलांचे संरक्षण व नोंदणी’ या महत्त्वपूर्ण योजनेला दिवा शहरातील महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, नोंदणीसाठी दिवा प्रभाग समिती कार्यालयात महिलांची मोठी गर्दी होत आहे.

या नोंदणी प्रक्रियेची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २९च्या नगरसेविका सौ. वेदिका साहिल पाटील यांनी दिवा प्रभाग समिती कार्यालयाला प्रत्यक्ष भेट देत पाहणी केली. यावेळी त्यांनी नोंदणीसाठी आलेल्या महिलांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून नोंदणी प्रक्रियेची माहिती घेतली.

**एकल महिलांना आधार देण्याचा उद्देश**

एकल महिलांना सन्मान, सुरक्षितता आणि स्वावलंबन मिळवून देण्याच्या उद्देशाने ठाणे महापालिकेच्या महिला व बालविकास विभागाकडून ही योजना राबविण्यात येत आहे. समाजातील एकल महिलांची नोंदणी करून त्यांच्यासाठी आवश्यक असलेल्या विविध कल्याणकारी उपाययोजना प्रभावीपणे राबविणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

**या महिलांना नोंदणी करता येणार**

योजनेच्या माहितीनुसार, विधवा, घटस्फोटिता, परित्यक्ता तसेच पतीपासून विभक्त राहणाऱ्या महिला यांच्यासह अविवाहित महिला आणि माहेर सोडून स्वतंत्रपणे राहणाऱ्या एकल महिलांना या योजनेअंतर्गत नोंदणी करता येणार आहे.

**२७ ऑगस्ट अंतिम मुदत!**



ठाणे महापालिका क्षेत्रातील पात्र महिलांनी या योजनेअंतर्गत आपली नोंदणी २७ ऑगस्ट २०२६ पूर्वी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील जास्तीत जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असेही पालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे. दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील योजनेसंदर्भातील अधिक माहितीसाठी रावसाहेब गोपीनाथ त्रिभुवन – ७९३८०३५३६० या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांच्या प्रत्यक्ष भेटीमुळे नोंदणी प्रक्रियेबाबत महिलांना अधिक माहिती व मार्गदर्शन मिळाले असून, दिव्यात या योजनेबाबत महिला वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## शिळ फाटा जंक्शन नाका : तिकीट आणि जाहिरातीतून कोट्यवधींची कमाई

### पण प्रवाशांना साधे छतही नाही – निवारा शेड कधी?


**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२६, शिळफाटा (ठाणे) :** शिळ फाटा जंक्शन नाका हा लाखो प्रवाशांचा जीव आहे. या एकाच चौकातून दिवा, मुंब्रा, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई आणि पनवेलकडे जाणाऱ्या बसेस जातात.

येथे ठाणे (TMT), नवी मुंबई (NMMT) आणि कल्याण-डोंबिवली (KDMT) या तिन्ही महापालिकांच्या बसेस थांबतात. दिवा शहराकडे आणि डोंबिवली-कल्याणकडे जाण्यासाठी दिवसभरात शेकडो बसेस येथून जातात. पण चौकाच्या चारही बाजूला - दिव्याकडे जाणारा असो, ठाण्याकडे जाणारा असो, नवी मुंबई, पनवेल किंवा कल्याण-डोंबिवलीकडे जाणारा असो - एकाही ठिकाणी प्रवाशांसाठी निवारा शेड नाही. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा तिन्ही ऋतूंमध्ये प्रवाशांना उघड्यावर उभे राहावे लागते.

**तिकिटाचे पैसे जातात कुठे?**

प्रवासी म्हणतात, तिन्ही परिवहन सेवा तिकिटाचे पैसे नियमित घेते, पण सुविधा देत नाही. मग प्रवाशांकडून घेतलेला पैसा जातो कुठे? हा पैसा इंधन, पगार आणि




दुरुस्तीत जातो असे सांगितले जाते, पण प्रवासी सुविधांसाठी एक रुपयाही खर्च होत नाही.

**बसवरील जाहिरातीतून लाखोंची कमाई, हिशेब नाही...**

येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक बसवर मोठ-मोठ्या कंपन्यांच्या, बिल्डरांच्या, क्लासेसच्या जाहिराती लावल्या जातात. एका बसच्या जाहिरातीतून वर्षाला ४० हजार ते १ लाख रुपये महापालिकेला मिळतात. शिळ फाट्यावरून रोज ३००-४०० बसेस जातात, म्हणजे वर्षाला कोट्यवधी रुपयांची कमाई.

नियमानुसार जाहिरातीतून मिळालेल्या पैशातील २५% रक्कम प्रवासी सुविधांसाठी - निवारा शेड, बाकडे, दिवे यासाठी वापरायची असते. पण शिळ फाटा नाक्यावर जाहिराती आहेत, पण शेडच नाही. मग तो पैसा जातो कुठे? याचा जाब महापालिकेने द्यावा.

**खरवली देवी मंदिराजवळही शेड नाही, भाविकांची गैरसोय**

मुंब्रा-पनवेल मार्गावर श्री खरवली देवीचे पुरातन जागृत देवस्थान आहे. देवीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळच बस थांबा आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक दर्शनासाठी येतात, पण तिथेही निवारा शेड नाही. त्यामुळे भाविकांना आणि प्रवाशांना उन्हा-पावसात उभे राहावे लागते. यासाठी श्री खरवली आई सेवा ट्रस्ट, शिळगांवकडून नगरसेवकांना निवेदन देण्यात आले आहे. शिळ फाटा परिसर ठाणे महापालिका हद्दीत येत असल्याने मूळ जबाबदारी TMC ची आहे. TMT ने पुढाकार घेऊन NMMT आणि KDMT सोबत तातडीने दिवा, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण-डोंबिवली या पाचही दिशांना आणि खरवली देवी मंदिरासमोर निवारा शेड बांधावे, अन्यथा प्रवासी आणि भाविकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## जि. प. उच्च प्राथमिक शाळा डोंगरहळदी नं. ३ चे ९ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे द्वारे आयोजित प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा- २०२६ मध्ये (४ थी) विद्यार्थी संख्या ९ व उच्च प्राथमिक (७ वी) विद्यार्थी संख्या १० असून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा डोंगरहळदी नं.३ ता. पोंभूर्णा, (पंचायत समिती पोंभूर्णा) जि. चंद्रपूर येथील विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश प्राप्त करत शाळेचा १०० टक्के निकाल लावला होता. त्यापैकी प्रत्यक्ष शिष्यवृत्तीसाठी वर्ग ४ थी मधून ४ विद्यार्थी तर वर्ग ७ वी तून ५ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्याने शाळेचा नावलौकिक वाढविला आहे.

वर्ग ४ थी च्या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेले शाळेतील वेदिका विनोद वाढई, अर्पित प्रेमदास लेनगुरे, अनुष्का जनार्दन लेनगुरे, अंजू अतुल कन्नाके तर वर्ग ७ वी च्या शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थी प्रणित संजय साखलवार, अमोल दुर्वास कन्नाके, पूर्वी पंढरी कन्नाके, रंचना विनोद वाढई, ओम बापुजी लेनगुरे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश मिळवून शाळेच्या वैभवात भर घातली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे डोंगरहळदी नं. ३ या गावात व शाळेमध्ये उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, मुख्याध्यापक तथा वर्ग ७ वी चे वर्गशिक्षक महादेव लांडे तसेच वर्ग ४ थीचे वर्गशिक्षिका विद्या येलमुलवार यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि पालकांचे मिळालेले सहकार्य या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे फलित आहे.

शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, शाळेतील शिक्षक वृंद, पालक आणि ग्रामस्थांच्या वतीने सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी मनः पूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# महाबळेश्वर येथे पैगंबर जयंती उत्साहात साजरी



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२६, महाबळेश्वर (सातारा) :** मिनारा मस्जिद च्या वतीन महाबळेश्वर येथे पैगंबर जयंती उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी महाबळेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हर्षद गालिंदे यांच्यासह पोलीस कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, मुस्लिम समाजातील नागरिक, युवक व विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी तौफिक पटवेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यांनी प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जीवनकार्याचा तसेच त्यांच्या शिकवणीचा परिचय उपस्थितांना करून दिला.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते पोलीस निरीक्षक हर्षद गालिंदे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच पोलीस हवालदार फरांदे, सिनगारे, पत्रकार बांधव यांचा सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे पोलिसांना शवविच्छेदनाच्या (पोस्टमार्टम) कार्यात मदत करणारे निवृत्त नगरपालिका कर्मचारी हाशमभाई वारुणकर यांचा पोलीस निरीक्षक हर्षद गालिंदे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना पोलीस निरीक्षक हर्षद गालिंदे म्हणाले की, पाच वेळची नमाज अदा करणे हा केवळ धार्मिक विधी नसून मन व शरीराला शिस्त लावणारी प्रक्रिया आहे.

विशेषतः तरुणांनी सकाळी लवकर उठून फजरची नमाज अदा केल्यास दिवसाची सुरुवात प्रसन्न वातावरणात होऊन मन व शरीर निरोगी राहण्यास मदत होईल. तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून चांगल्या मार्गाचा अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले.

धार्मिक शिस्त, परस्पर आदर आणि नमाज पठणाची परंपरा असलेल्या कुटुंबांमध्ये अनेकदा वाद-विवाद कमी असल्याचे दिसून येते, असेही त्यांनी सांगितले. आपल्या बालपणीच्या आठवणी सांगताना गालिंदे यांनी पंढरपूर येथे आपले बालपण गेले असून, त्या काळात मुस्लिम समाजातील नागरिकांमध्ये वावरण्याची संधी मिळाल्याचे नमूद केले.

इस्लाम धर्मातील तत्त्वांनुसार जीवन जगणाऱ्या आणि ५ वेळा नमाज अदा करणाऱ्या नागरिकांच्या शिस्तबद्ध जीवनपद्धतीचे त्यांनी कौतुक केले. समाजात शांतता, सलोखा आणि बंधुभाव कायम राहण्यासाठी प्रत्येकाने आपल्या धर्मातील चांगल्या शिकवणीचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले. यानंतर पोलीस निरीक्षक हर्षद गालिंदे यांच्या हस्ते नारळ फोडून राज्यगीताच्या गजरात मिरवणुकीची सुरुवात मिनारा मस्जिद येथून करण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तौफिक पटवेकर यांच्यासह समीर शेख, अलीअजगर पिंजारी, इरफान (हिरो) शेख, शब्बीर पटेल, परवेज शेख, सईद पटवेकर, अन्सार शेख, मलिक शेख, नोबीन खान ,सरफराज शेख, इरफान मौलाना व बांगी साहेब यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी ज्येष्ठ नागरिक मुनीर सय्यद, राजमोहम्मद शेख, मिनारा मस्जिदचे सभासद, मुस्लिम समाजातील नागरिक, युवक तसेच विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# EWS लाभार्थ्यांसाठी ७५ हजार जप्तीच्या निर्णयाविरोधात आंबेडकर स्टुडंट्स असोसिएशनचा आंदोलनाचा इशारा



**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२६, पनवेल (नवी मुंबई) :** सिडकोच्या गृहनिर्माण योजनांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (EWS) लाभार्थ्यांसाठी लागू असलेल्या ७५ हजार जप्तीच्या अटीविरोधातआंबेडकर स्टुडंट्स असोसिएशन महाराष्ट्रने तीव्र भूमिका घेतली आहे.

लॉटरी लागल्यानंतर व वाटपपत्र मिळाल्यानंतर अपरिहार्य कारणांमुळे घराचा त्याग केल्यास ७५ हजार रक्कम जप्त करण्याची तरतूद तात्काळ रद्द करावी, अन्यथा बेमुदत धरणे व अन्नत्याग आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. सिडकोच्या गृहनिर्माण योजनांचा मुख्य उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, एथड प्रवर्गातील लाभार्थ्यांकडून घराचा त्याग केल्यास ७५ हजारांची रक्कम जप्त केली जात असल्याने गरीब नागरिकांवर मोठा आर्थिक भार पडत असल्याचे संघटनेने आपल्या निवेदनात म्हटले आहे.अनेक वेळा लाभार्थी स्वेच्छेने नव्हे, तर गृहकर्ज मंजूर न होणे किंवा अपेक्षेपेक्षा कमी कर्ज मिळणे, नोकरी जाणे, उत्पन्न कमी होणे, गंभीर आजारपण, कुटुंबातील कमावत्या व्यक्तीचे निधन, कौटुंबिक परिस्थितीतील बदल, नोकरी किंवा व्यवसायानिमित्त स्थलांतर तसेच घराच्या नोंदणी, मुद्रांक शुल्कासह इतर खर्च पेलणे शक्य न होणे यांसारख्या अपरिहार्य कारणांमुळे घराचा त्याग करण्यास बाध्य होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, कागदपत्रांतील त्रुटी, तांत्रिक अडचणी, नैसर्गिक आपत्ती, अपघात किंवा इतर अनपेक्षित परिस्थितीमुळेही अनेक लाभार्थ्यांना पुढील प्रक्रिया पूर्ण करता येत नाही.

विशेष म्हणजे, एकाच वेळी सिडको आणि म्हाडा या दोन्ही संस्थांच्या लॉटरीत घर लागल्यास दोन्ही घरे स्वीकारणे शक्य नसल्याने एका घराचा त्याग करणे अपरिहार्य ठरते, असा मुद्दाही संघटनेने उपस्थित केला आहे. या पार्श्वभूमीवर EWS प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी ७५ हजार जप्तीची अट पूर्णपणे रद्द करावी किंवा जप्तीची रक्कम अत्यंत नाममात्र ठेवावी, तसेच या प्रवर्गासाठी स्वतंत्र आणि सवलतीचे धोरण तयार करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना स्वतःचे घर मिळावे या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या गृहनिर्माण योजनांमध्ये कठोर आर्थिक दंडात्मक तरतुदी लागू करणे सामाजिक न्यायाच्या भावनेला बाधक असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. संघटनेने संबंधित प्रशासनाकडे सदरील मागणीचा सकारात्मक विचार करून तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

घराचा त्याग करणाऱ्या उमेदवारांकडून जप्त करण्यात आलेली रक्कम व शुल्क परत करण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आंबेडकर स्टुडंट्स असोसिएशन महाराष्ट्र सिडकोच्या दालनात बेमुदत धरणे व अन्नत्याग आंदोलन छेडेल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

# शिरुरमध्ये गोळीबार करुन दहशत माजविणाऱ्या कुख्यात टोळीवर मोक्का




**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.२६, शिरूर (पुणे) :** शिरुर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीर अग्निशस्त्रांचा वापर करुन गोळीबार, खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी, जबरी चोरी आणि संघटित गुन्हेगारीच्या माध्यमातून दहशत निर्माण करणाऱ्या इशप्पा ऊर्फ विशाल जगन्नाथ पंदी (वय २४, रा. वाघोली, ता. हवेली, जि. पुणे) याच्या नेतृत्वाखालील ११ जणांच्या टोळीविरोधात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाईला विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांनी मंजुरी दिली आहे. त्यामुळे या टोळीवर पोलिसांनी आता कायद्याचा फास अधिक घट्ट केला आहे.

दि.१ जून २०२६ रोजी सायंकाळी सव्वापाचच्या सुमारास सरदवाडी हद्दीतील करडे घाट येथील राजस्थान ढाब्याजवळ न्हावरा फाटा-करडे रस्त्यावर हा थरार घडला. फिर्यादी उमेश अनिल जगदाळे हे मित्रांसह टोयाटो टायझरमधून शिरुरकडे जात असताना लाल रंगाच्या किया सोनेटने त्यांच्या वाहनाला धडक दिली. त्यानंतर वाहनातून पाच जण आणि मोटारसायकलवरुन आलेल्या दोघांनी मिळून पूर्वीच्या पैशांच्या व्यवहाराच्या वादातून हल्ला केला.

या हल्ल्यात विशाल सुनील काळे (वय ३१, रा. ढोरआळी, शिरुर) याच्यावर गोळीबार तसेच दगडांनी हल्ला करुन त्याचा खून करण्यात आला. केदार चंद्रकांत झाडगे (वय २५, रा. कुंभारआळी, शिरूर) याच्या डोक्यात घातक हत्याराने वार करुन त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच फिर्यादीच्या दिशेनेही बंदुकीतून गोळीबार करुन त्याच्या जीवाला धोका निर्माण करण्यात आला.

या प्रकरणाचा तपास शिरुर पोलीस स्टेशन आणि स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण यांनी संयुक्तपणे सुरु केला.

तपासादरम्यान या गुन्ह्यात एकूण ११ आरोपींचा सहभाग निष्पन्न झाला. टोळीप्रमुख इशप्पा ऊर्फ विशाल जगन्नाथ पंदी याच्यासह अमन ऊर्फ मुन्ना दस्तगीर पटेल, सनी संजय यादव, आदित्य बापुसो ऊर्फ बापू शिंदे, आदित्य दीपक कांबळे, पांडुरंग बालाजी कांबळे, अभिषेक ऊर्फ घ्या हनुमान मिसाळ, सिद्धेश ऊर्फ सिद्धार्थ ऊर्फ बाल्या तुकाराम शिंदे, सुरज ऊर्फ नन्या संतोष मोरे आणि देवानंद शिवाजी चव्हाण यांना अटक करण्यात आली असून ते न्यायालयीन कोठडीत आहेत. गोपाळ संजय यादव हा फरारी आहे.

या टोळीविरोधात शिरुर, लोणीकंद, वाघोली, फुरसुंगी, सांगवी, तळेगाव दाभाडे आणि अहिल्यानगर एमआयडीसी पोलीस ठाण्यांमध्ये खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी, जबरी चोरी, सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला, घातक हत्यारांचा वापर, बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगणे, अपहरण, दरोडा आणि संघटित गुन्हेगारीसह तब्बल २२ गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले.

या टोळीची वाढती दहशत, संघटित पद्धतीने गुन्हे करण्याची प्रवृत्ती आणि परिसरातील शांतता व सार्वजनिक सुव्यवस्थेला निर्माण झालेला धोका लक्षात घेऊन पुणे ग्रामीण पोलिसांनी मोक्कांतर्गत कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला. विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा यांनी कागदपत्रांची पडताळणी करुन मोक्का कायद्यांतर्गत कलमांची वाढ करण्यास कायदेशीर मंजुरी दिली. त्यानंतर या गुन्ह्याचा तपास शिरुर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र भोसले यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील, पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, सहायक पोलीस फौजदार महेश बनकर, रामदास बाबर, गणेश धनवे, वैभव सावंत यांनी केली.

तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे (LCB) पोलीस हवालदार तुषार पंदारे, राजू मोमीन, जनार्दन शेळके, संजू जाधव, पोलीस कॉन्स्टेबल सागर धुमाळ, शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार राहुल भवर, शरद वारे, पोलीस अंमलदार सचिन भोई, विजय शिंदे, गणेश गोसावी, रोहित बाचल, वैभव शेलार तसेच तत्कालीन पोलीस हवालदार परसराम सांगळे आणि नितीन सुद्रिक यांनी या तपासात महत्त्वाची भूमिका बजावली.

## थोडक्यात बातम्या

### विद्यार्थ्यांनी स्वनिर्मित राख्या बांधून साजरा केला रक्षाबंधनाचा अनोखा उपक्रम






**अक्षराज : स्वप्निल जावळे**

**दि.२६, शिरवळ (सातारा) :** रयत इंग्लिश मीडियम स्कूल, शिरवळ येथील विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाच्या निमित्ताने स्वतःच्या हाताने आकर्षक राख्या तयार करून समाजातील विविध घटकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा अनोखा उपक्रम राबविला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या स्वनिर्मित राख्या शिरवळ ग्रामपंचायतीचे सरपंच रविराज दुधगावकर, उपसरपंच राहुल तांबे तसेच ग्रामपंचायत सदस्य अमोल कबूले व इतर सदस्यांना बांधण्यात आल्या. शिरवळ ग्रामपंचायतचे सरपंच रविराज दुधगावकर यांनी रयत इंग्लिश मीडियम स्कूल शिरवळ या उपक्रमशील शाळेचे मनापासून कौतुक केले ते याप्रसंगी म्हणाले की, रयत इंग्लिश मीडियम स्कूल शिरवळ ही शाळा इंग्रजी माध्यमाची असली तरी आपली संस्कृती विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचे फार मोठे कार्य करत आहे. रयत इंग्लिश मीडियम शिरवळ ही शाळा नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत असते. त्यासाठी त्यांनी शाळेचे मनापासून कौतुक केले. तसेच विद्यार्थिनींना खाऊ वाटप देखील केले. त्याचप्रमाणे शिरवळ ग्रामीण पोलीस स्टेशन येथे जाऊन पी.आय महेश इंगळे तसेच इतर पोलीस अधिकारी यांनाही विद्यार्थ्यांनी प्रेमपूर्वक राखी बांधली. पोलीस अधिकाऱ्यांनी देखील विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले अतिशय अनोखा उपक्रम आहे.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी समाजाच्या सुरक्षिततेसाठी आणि विकासासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली. व बहिण भावांच्या प्रेमळ नात्याचा आदरपूर्वक सन्मान करत आहात हे देखील सांगितले. विद्यार्थ्यांनी स्वतः राख्या तयार करून त्या बांधल्याने त्यांच्यामध्ये सर्जनशीलता, सामाजिक बांधिलकी, प्रेम, बंधुभाव आणि कृतज्ञतेची भावना निर्माण झाली. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे शाळेच्या बॉडी मेंबर माननीय आप्पासाहेब देशमुख यांनी कौतुक केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे आणि पर्यवेक्षिका वासंती घाडगे यांचे मोलाचे मार्गदर्शन व योगदान लाभले. तसेच सर्व शिक्षकवृंदानेही उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या या सामाजिक जाणीवेतून रक्षाबंधनाचा सण केवळ भाऊ-बहिणीपुरता मर्यादित न राहता समाजातील विविध घटकांशी प्रेम, आदर आणि आपुलकीचे नाते जोडणारा ठरला.

### पालशेत बाजारपेठ - आधुनिक काळातील 'चिखल-पुराण'



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२६, पालशेत (गुहागर) :** गुहागर तालुक्यातील 'पालशेत बाजारपेठेतील रस्त्याची झालेली दयनीय अवस्था, जीवघेण्या खड्ड्यांकडे प्रसिद्धी माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते. या समस्येची तात्काळ दखल घेत पंचायत समितीचे सभापती प्रणव पोळेकर यांनी स्वतः लक्ष घालून दि. २२ ऑगस्ट रोजी रात्री युद्धपातळीवर बाजारपेठेतील जीवघेणे खड्डे बुजवले होते. त्यामुळे व्यापारी आणि वाहनधारकांनी समाधान व्यक्त केले होते.

मात्र, हा आनंद अवघ्या चार दिवसांतच मावळला आहे. येथील व्यापारानी दिलेल्या माहितीनुसार बाजारपेठेतील देसाई यांच्या दुकानाजवळील सर्वात मोठा आणि धोकादायक खड्डा जैसे-थे झाला असल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी रस्त्याला पाण्याच्या निचऱ्यासाठी आवश्यक असलेला योग्य स्लोप (उतार) न दिल्याने पाणी साचून राहत आहे. साचलेले पाणी आणि वरून पडणाऱ्या पावसामुळे संपूर्ण पालशेत बाजारपेठेत चिखलाचे साम्राज्य पसरले असून, रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे.

बाजारपेठेत साचलेल्या चिखलामुळे दुकानदार आणि व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. भर बाजारातून एखादे वाहन भरधाव वेगाने गेल्यास दुकानातील सामानावर आणि ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या,अंगावर चिखल उडत आहे. त्यामुळे व्यवसाय करणे देखील कठीण झाले आहे. बाजार पेठेत प्रति वर्षी पडणाऱ्या खड्ड्यांकडे स्थानिक आमदार, स्थानिक प्रशासन यांनी पालशेत बाजारपेठेतील रस्त्याची दर्जोन्नती होण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### जिंतूरच्या गटशिक्षणाधिकारी पदी प्रगती नेहवाल

#### शैक्षणिक प्रशासनाला मिळणार नवी दिशा



**अक्षराज : राहीम कोकर**

**दि.२६, जिंतूर (परभणी) :** जिंतूर पंचायत समितीच्या शिक्षण विभागात नव्या गटशिक्षणाधिकारी म्हणून प्रगती नेहवाल यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नुकताच आपल्या पदाचा पदभार स्वीकारला आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे जिंतूर तालुक्यातील शैक्षणिक प्रशासनात नव्या नेतृत्वाची सुरुवात झाली आहे.प्रगती नेहवाल यांना शिक्षण विभागातील प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असून, यापूर्वी त्यांनी पुणे जिल्हा परिषदेमध्ये प्रशिक्षण घेतले आहे. तसेच हवेली तालुक्यात विस्तार अधिकारी म्हणूनही त्यांनी काही काळ कार्य केले आहे. या अनुभवाच्या जोरावर जिंतूर तालुक्यातील शाळा, शिक्षक, विद्यार्थी तसेच शैक्षणिक योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर त्या भर देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिंतूर तालुक्यात ग्रामीण तसेच शहरी भागातील अनेक जिल्हा परिषद व इतर शाळा कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, शाळांमधील मूलभूत सुविधा सुधारणे, शिक्षकांच्या अडचणी सोडविणे, शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि शाळांच्या प्रशासकीय कामकाजाला गती देणे, ही गटशिक्षणाधिकारी म्हणून त्यांच्यासमोर महत्त्वाची आव्हाने असणार आहेत.

विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, शाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि शिक्षकांना कामकाजासाठी योग्य वातावरण मिळावे, यासाठी शिक्षण विभागाने अधिक सक्रिय भूमिका घेण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर प्रगती नेहवाल यांच्या अनुभवाचा जिंतूर तालुक्याला निश्चितच फायदा होईल, अशी अपेक्षा शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.नव्या जबाबदारीचा पदभार स्वीकारल्यानंतर जिंतूर तालुक्यातील शैक्षणिक प्रश्न, शाळांच्या समस्या आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी त्या कोणत्या पद्धतीने काम करतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.